माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :- 9८00 दिनांक :- 22/८/१९

अपिल प्राधिकारी तथा महापालिका सहाय्यक आयुक्त कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.२१.०८.२०१९

१. अपिलकर्ता श्री भरत ब जैन (सुराणा),
राहणार :- तारा अपार्टमेंट, फ्लॅट नं. ६, दुसरा मजला,
महर्षीनगर, पुणे ४११०३७.

२. जन माहिती अधिकारी तथा,
उप अभियंता,कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

श्री भरत ब. जैन (सुराणा)
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका.

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्री भरत ब जैन (सुराणा)यांनी दिनांक ३०/०५/२०१९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता,कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका यांचेकडे १०% व त्यापेक्षा कमी असलेल्या टेंडरबाबतची माहिती मिळणेकामी अर्ज केला होता.

अर्जदाराने अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे अंदाजे १८०० पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/- रुपये प्रमाणे एकूण ३६००/- रु. रक्कमेचा भरणा केलेनंतर माहिती उपलब्ध करून दिली जाईल असे पत्र जा.क्र.५४४ दि.१२.०६.१९ अन्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| ३०/०५/२०१९ | २९/०६/२०१९ | १२/०६/२०१९ | निरंक | निरंक |

प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण पुढीलप्रमाणे – माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ११/०७/२०१९ | २५/०७/२०१९ | नाही | – | १९/०८/२०१९ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. २१/०८/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | १०% व त्यापेक्षा कमी असलेल्या टेंडरबाबतची माहिती मिळणेकामी अर्ज केला होता. | कार्यालयाकडील उपलब्ध माहितीचे अंदाजे १८०० पृष्ठे असून प्रती पृष्ठ २/- रुपये प्रमाणे एकूण ३६००/- रु. रक्कमेचा भरणा केलेनंतर माहिती उपलब्ध करून दिली जाईल असे पत्र जा.क्र.५४४ दि.१२.०६.१९ अन्वये कळविले. |

## विवेचन

अपिलकर्ता श्री भरत ब जैन (सुराणा) यांनी अर्जात नमूद केलेप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहिती अर्जदारास देणेत आलेली आहे असे मा.जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता यांनी सांगितले.

अर्जात नमूद केलेप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहिती दि.०९/०८/२०१९ रोजी मिळाली असलेचे अपिलकर्ता श्री भरत ब जैन (सुराणा) यांनी सांगितले.

## -: आदेश :-

अर्जात नमूद केलेप्रमाणे कार्यालयाकडील उपलब्ध माहिती दि.०९/०८/२०१९ रोजी मिळाली असलेचे अपिलकर्ता श्री भरत ब जैन (सुराणा) यांनी सांगितले.

सबब, प्रकरण निकाली काढण्यात येत आहे.

(रविंद्र घोरपडे)
अपिल प्राधिकारी तथा
महापालिका सहाय्यक आयुक्त,
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

दिनांक आणि ठिकाणः २१/०८/२०१९,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-१. अपिलकर्ता श्री भरत ब जैन (सुराणा),
राहणार :- तारा अपार्टमेंट, फ्लॅट नं. ६, दुसरा मजला,
महर्षीनगर, पुणे ४११०३७.

२. श्री अनिल सोनवणे,
जन माहिती अधिकारी तथा,
उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......